10 JUN 2021
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूजल पुनर्भरण काळाची गरज : कलशेट्टी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राज्यातील अति शोषित, शोषित पाणलोट क्षेत्रे व तेथील पाण्याच्या पातळीत झालेली घट भरून काढण्यासाठी पाऊस पाणी संकलन आणि भूजल पुनर्भरण ही काळाची गरज आहे, असे मत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी सोमवारी व्यक्त केले. राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात भूजल पुनर्भरण, पावसाचे पाणी संकलन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या सुवर्ण महोत्सवीवर्षानिमित्त व पर्यावरणदिनाचे औचित्य साधून भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागाच्यावतीने पाऊस पाणी संकलन व भूजल प्रदूषण या विषयावरील वेबिनारमध्ये ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 0 JUN 2021
पुढारी

# वाङ्मय प्रकल्प समितीवर प्रा. अविनाश सप्रे यांची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळाच्या वाङ्मय प्रकल्प समितीवर प्रा. अविनाश सप्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे हे या समितीचे अध्यक्ष असून, डॉ. रमेश वरखेडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नितीन रिंढे, नाटककार प्रेमानंद गज्वी हे अन्य सदस्य या समितीवर आहेत.

मंडळाकडे आलेल्या विविध वाङ्मयीन प्रकल्पांची चर्चा करून निर्णय घेणे, ग्रंथांना आर्थिक मदत देणे, मंडळाच्या वतीने महत्त्वाच्या विविध विषयांवरील ग्रंथ प्रकाशित करणे, 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या सदरामध्ये मान्यवरांची चरित्रे प्रकाशित करणे, जागतिक ग्रंथांचे अनुवाद प्रकाशित करणे अशी महत्त्वाची कामे या समितीमार्फत केली जातात. प्रा. अविनाश सप्रे या समितीप्रमाणेच मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या 'भारतीय भाषा आणि साहित्य' या विभागाचे समन्वयक संपादक म्हणूनही कार्यरत आहेत.

10 JUN 2021
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील ४७ संशोधक 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी' रँकिंगमध्ये

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह विद्यापीठातील ४६ संशोधकांना यंदाच्या वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये स्थान मिळाले आहे. ए. डी. सायंटिफिक इंडेक्सने ही यादी नुकतीच जाहीर केली आहे.

अमेरिकेच्या मिशिगन युनिर्व्हसिटीतील प्रा. मुरत आल्पर व प्रा. सिंहान डॉजर यांनी संयुक्तपणे आल्पर डॉजर सायंटिफिक इंडेक्स विश्लेषित केला. त्यासाठी जगातील संशोधकांचा पाच वर्षांतील एच. इंडेक्स, आय टेन इंडेक्स, हे निर्देशांक सायटेशन स्कोअर विचारात घेण्यात आला. जगातील १८१ देशांतील १० हजार ६५५ विद्यापीठांतील ५ लाख ६५ हजार ५५३ संशोधकांची माहिती संकलित केली. वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग, अर्थात मानांकनात कृषी वन, कला, स्थापत्य, वाणिज्य, व्यवस्थापन, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, इतिहास, तत्वज्ञान, कायदे अभ्यास, वैद्यकीय, आरोग्य विज्ञान, सामाजिक शास्त्रांसह २५६ उपशाखांतील संशोधकांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. शिर्के हे रँकिंगमध्ये संख्याशास्त्रातील एकमेव संशोधक आहेत. प्र कुलगुरू डॉ. पाटील यांना मटेरियल सायन्स, नॅनोविज्ञान संशोधनातील क्रमवारीत आघाडीचे स्थान मिळाले आहे. क्रमवारीत रसायनशास्त्र ११, पदार्थविज्ञान, मटेरियल सायन्स ९, वनस्पतीशास्त्र, जैवरसायन, तंत्रज्ञान, नॅनो विज्ञान, इलेक्ट्रिकल इलेक्ट्रानिक्स शाखेतील प्रत्येकी ३, प्राणीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, धातुविज्ञान, अन्नविज्ञान शाखेतील प्रत्येकी २ व गणित, फॉर्मसी संगणकशाखातील प्रत्येकी १ रँकींगमध्ये आहेत.

**वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंगमधील संशोधक**

डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डी. के. राजपुरे, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. अण्णासाहेब मोहोळकर, डॉ. एन. आय. तलवार, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. टी. जे. शिंदे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. ए. बी. गडकरी, डॉ. विजया पुरी, डॉ. सोनल चोंदे, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. एम. कोळेकर, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. एम. बी. देशमुख, डॉ. डी. एच. दगडे, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. अनंत दोडमणी, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एन. एस. चव्हाण, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. ज्योती जाधव, डॉ. नीरज राणे, डॉ. एम. व्ही. शांताकुमार, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. पंकज पवार, डॉ. पी. बी. दंडगे, डॉ. पी. एस. बासबेकर, डॉ. डी. टी. डोंगळे, डॉ. आर. आर. मुधोळकर, डॉ. एस. बी. सादळे, डॉ. एन. आर. प्रसाद, डॉ. किरणकुमार शर्मा, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. विजय कोरे, डॉ. ए. के. साहू, डॉ. राहुल रणवीर, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. के. डी. कुचे.